# प्रकरण पहिले

# प्रकरण पहिले.

प्रास्ताविक :- १९५२ ते १९७७ लोकसभा निवडणुकीची ऐतिहासिक पार्श्वभूमी.

प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये राजकीय पक्षांचे अस्तित्व अपरिहार्य असते. लोकमत सुसंघटीत आणि प्रभावी करुन आपली तात्त्विक भूमिका आणि कार्यक्रम यांच्या मदतीने पाठिंबा मिळवून राजकीय सत्ता काबीज करणे आणि ती सत्ता आपला कार्यक्रम व्यवहारात आणण्याकरिता वापरुन लोकहित साधणे हया उद्देशाने राजकीय पक्ष स्थापन केले जातात. राजकीय पक्ष आपली तत्वे आणि कार्यक्रम यांचा प्रचार आणि प्रसार करुन आपली भूमिका लोकांना पटवून देऊन राजकीय सत्ता हस्तगत करतात.

लोकशाही शासनपध्दती सामुदायिक चर्चा करुन तत्वनिर्णय करणारी पध्दती आहे त्यामुळे अनुकूल मत व प्रतिकूल मत ज्यांचे आहे असे दोन पक्ष निर्माण होतात. म्हणूनच मॅक आव्हर यांनी राजकीय पक्षांची व्याख्या करतांना असे म्हटले आहे की, "विशिष्ट राजकीय तत्वावर अगर धोरणावर अधिष्टीत अशी संस्था म्हणजे राजकीय पक्ष होय. सनदशीर चळवळ करुन हा पक्ष सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करतो." १

प्रो. ग्राझीया यांच्या मते "पक्षाची निर्मिती ही विशिष्ट उद्दिष्टाभोवती होत असते, त्यांच्या मते राष्ट्रवाद, राष्ट्रीय आणि नैतिक मुल्ये, सामाजिक आणि आर्थिक वर्ग, अलौकिक नेतृत्व व गुणश्रेष्ठत्व या प्रमुख उद्दिष्टाभोवती राजकीय पक्षांची निर्मिती होते." २

## १] ध्येयधोरण, कार्यक्रम आणि निवडणूक जाहीरनामा यांचे महत्त्व :-

प्रत्येक राजकीय पक्ष निवडणूकीत सहभागी होतांना निवडणूक जाहीरनामा आणि त्यातील धोरणे, कार्यक्रम आणि उद्दीष्टे यांचा आधार घेतो. ध्येय-धोरण आणि जाहीरनामा यांच्या आधारे राजकीय पक्ष आपली विचारसरणी स्पष्ट करतो आणि ते धोरण राष्ट्रीय समस्यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करतो.

..२..

प्रो. हार्डग्रीव्ह यांच्या शब्दात "पक्षाच्या जाहिरनाम्यावरुन राजकीय पक्षाचे बदलते स्वरुप, त्यांच्या विविध कार्यक्रमांचे यशापयश, विचारसरणीतील फरक आणि पक्षाचा पाया किती विस्तृत आहे हे समजू शकते." [3] निवडणूक जाहिरनामा हा राजकीय पक्षांच्या वर्तमानकालीन ध्येयधोरणांची मूलभूत चौकट असते. पक्षाला एकत्र बांधून ठेवण्याचे आणि दैनंदिन कामकाजामध्ये मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य विचारसरणीमुळे प्राप्त होते. प्रत्येक राजकीय पक्षाने विशिष्ट विचारसरणीचा स्वीकार केलेला असतो. परंतु बदलत्या परिस्थितीनुसार त्यातील मुल्ये बदलतात. म्हणून पामर यांनी म्हटल्याप्रमाणे राजकीय पक्षांची तोंडओळख विशेषत: त्यांच्या निवडणूक जाहिरनाम्यावरुन होत असते." [4]

निवडणूकीमध्ये राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्यांचा समावेश होतो. सामान्यत: तत्कालीन सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समस्या सोडविण्यासाठी त्यांचा व्यापक दृष्टीने आधार घेतला जातो म्हणूनच १९८०, १९८४ आणि १९८९ या तीन महत्वाच्या लोकसभा निवडणूकीमधील मुख्य राजकीय पक्षांच्या भूमिकांचे जाहिरनाम्यावर आधारीत मुल्यमापन करण्याचा प्रयत्न या अभ्यासातून केला आहे.

या तीन निवडणूका अभ्यासासाठी निवडण्याचे मुख्य कारण म्हणजे स्वतंत्र भारताच्या इतिहासामध्ये या काळात अनेक राजकीय घडामोडी झाल्या. १९८० मध्ये जनता पक्षाचा पराभव करुन कॉंग्रेस पक्ष सत्तेवर आला. १९८४ मध्ये कॉंग्रेसला पुन्हा अद्भुत यश प्राप्त झाले आणि १९८९ च्या निवडणूकीत कॉंग्रेस पक्षाचा पराभव करुन आघाडीचे सरकार सत्तेवर आले. राजकीय पक्षांनी या निवडणूका कोणत्या मुद्यांच्या आधारे लढविल्या यावरुन राजकीय पक्षांच्या विचारसरणीचे मुल्यमापन करण्याच्या दृष्टीने या निवडणूका महत्वाच्या आहेत. १९७७ या जनता पक्षाचा प्रयोग नेतृत्वस्पर्धा आणि पक्षातील हेवेदावे यामुळे फसल्यानंतर १९८० मध्ये पुन्हा कॉंग्रेस पक्ष सत्तेवर आला. कॉंग्रेसची एकाधिकारशाही पुन्हा प्रस्थापित झाली. १९८४ मध्ये इंदिरा गांधींच्या हत्येनंतर राजीव गांधींच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस पक्षाला स्वच्छ आणि कार्यक्षम सरकार देण्याच्या आधारावर अद्भूत यश मिळाले.

देशामध्ये एकपक्षप्रभुत्व पध्दती निर्माण झाली असा भास निर्माण झाला आणि १९८९ च्या निवडणूकीत विरोधी पक्षांनी समान कार्यक्रमावर एकत्र येऊन निवडणूक लढविली आणि आघाडीचे सरकार स्थापन केले.

अशाप्रकारे राजकीय पक्षांनी कोणत्या मुद्यांच्या आधारे १९८०, १९८४ आणि १९८९ च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये यश संपादन केले याचे विश्लेषण त्यांच्या जाहिरनाम्यातील ध्येयधोरण आणि कार्यक्रम यांच्या सहाय्याने तपासून पाहण्यांचा प्रयत्न या अभ्यासातून केला आहे. त्यापूर्वी भारतातील एकूण निवडणूकांचा विचार केल्यास या तीन निवडणूकांचे स्पष्टीकरण हवे तसेच यापूर्वीच्या निवडणूकीतील यांचे संदर्भ आहे म्हणून त्यांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

२] भारतातील राजकीय पक्षांच्या प्रगतीचा ऐतिहासिक आढावा: १९५२ ते १९७७.

## १. पहिली सार्वत्रिक निवडणूक १९५२:-

२६ जानेवारी, १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात आली. लोकशाही पध्दती स्वीकारल्यामुळे स्वतंत्र भारतातील पहिल्या सार्वत्रिक निवडणूका १९५२ मध्ये घेण्यात आल्या. भारतात प्रौढ आणि सार्वत्रिक मताधिकाराच्या तत्वावर लढविली गेलेली ही पहिलीच निवडणूक होती. शिवाय येथील बहुसंख्य मतदार अशिक्षित असून सुध्दा या निवडणूकीत मतदारांनी आपल्या मताचा अधिकार बजावला.

पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीत अनेक राजकीय पक्ष निवडणूकीच्या राजकारणात सहभागी झाले. विशेषत: कॉंग्रेसने समाजवादी पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांचे आव्हान स्वीकारले. ही निवडणूक लढविण्याच्या

राजकीय पक्षामध्ये काँग्रेस हाच ख-या अर्थाने राष्ट्रव्यापी पक्ष होता. त्याला अनेक घटक कारणीभूत आहेत. समाजवादी नेते अशोक मेहता यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास "स्वातंत्र्यप्राप्तीची साधने, सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांचे सामर्थ्य, जहाल विचारांचे अनेक गट, समाजवादासंदर्भात असलेला गैरसमज, १९४८ मधील काँग्रेस फुटीमुळे झालेले सामाजिक आणि राजकीय बदल यामुळे काँग्रेसपुढे मोठे आव्हान होते. याच कारणामुळे नवी विचारसरणी, संघटनात्मक विस्तार आणि राष्ट्रीय विचारप्रवाह यांना चालना मिळाली." [5] कम्युनिस्ट पक्षांनी निवडणुकीच्या प्रक्रियेत प्रथमच सक्रिय भाग घेतला. एकूण चौदा राजकीय पक्ष निवडणुकीत सहभागी झाले. लोकसभेच्या या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने ४८९ जागांपैकी ३६४ जागा जिंकून बहुमत मिळविले. म्हणूनच असे म्हटले जाते की, १९५२ च्या निवडणुकीत काँग्रेस विजयी झाली याचे कारण म्हणजे काँग्रेसला लाभलेला स्वातंत्र्य चळवळीचा वारसा आणि स्वातंत्र्यप्राप्ती-साठी केलेली रक्तरंजीत क्रांती होय." [6] काँग्रेसच्या खालोखाल या निवडणुकीत १६ जागा जिंकणारा भारतीय कम्युनिस्ट पक्ष हा दुसरा मोठा पक्ष होता. कारण या पक्षाने आपले धोरण बदलून लोकशाही मार्ग स्वीकारला आणि नेहरू शासनाच्या परराष्ट्र धोरणाला आणि प्रागतिक स्वरूपाच्या कार्यक्रमाला संमती दिली.

समाजवादी पक्ष हा प्रमुख विरोधी पक्ष म्हणून ओळखला जात होता कारण या पक्षामध्ये जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव, अच्युतराव पटवर्धन, डॉ. लोहिया यांच्यासारखे १९४७ मध्ये महत्त्वाची भूमिका बजावलेले अग्रगण्य नेते होते. परंतु या पक्षावर लोकांनी तितकासा विश्वास टाकला नाही. कारण या पक्षाजवळ राष्ट्रव्यापी आणि मजबूत अशा स्वरूपाची संघटना नव्हती. या पक्षाला १२ जागा आणि १० टक्के मते मिळाली. किसान मजदूर प्रजा पक्षाला ९ जागा व ५.८टक्के मते मिळाली. जनसंघाला तीन जागा व ३.१ टक्के मते मिळाली, आणि इतर लहान-मोठया पक्षांना ३५ जागा व ११.१ टक्के मते मिळाली. अपक्ष उमेदवारांनी १५.८ टक्के मते मिळवून ४१ जागा जिंकल्या. खाली दिलेल्या तक्त्यावरून राजकीय पक्षांची लोकसभेतील स्थिती लक्षात येईल.

..५..

5

तक्ता क्रमांक १

पहिली सार्वत्रिक निवडणूक १९५२.

| पक्ष | उमेदवार | जिंकलेल्या जागा | जागा % | मिळालेली मते | मतांची टक्केवारी | प्रत्येक उमेदवाराची मते. |
|---|---|---|---|---|---|---|
| काँग्रेस | ७७२ | ३६४ | ७४.४ | ४७६६५८७५ | ४५.० | १,०९,९८७ |
| मा. क. प. | ४९ | १६ | ३.३ | ३४८४४०१ | ३.३ | ७१,११० |
| समाजवादी पक्ष | २५६ | १२ | २.५ | ११२१६७७९ | १०.६ | ४३,८१६ |
| के. एम. पी. | १४५ | ९ | १.८ | ६१५६५५८ | ५.८ | ४२,४५९ |
| जनसंघ | ९३ | ३ | ०.६ | ३२४६२८८ | ३.१ | ३४,९०६ |
| एच. एम. | ३१ | ४ | ०.८ | १००३०३४ | ०.९५ | ३२,३५६ |
| आर. पी. आय. | २७ | २ | ०.४ | २५०१९६४ | २.३६ | ९२,६६५ |
| आर. आर. पी. | ५५ | ३ | ०.६ | २१५१६०३ | २.०३ | ३९,१२० |
| इतर पक्ष | २१५ | ३५ | ७.२ | ११७३९२४४ | ११.१ | ५४,६०१ |
| स्वतंत्र उमेदवार | ५२१ | ४१ | ८.४ | १६७७८७४९ | १५.८ | ३२,२०५ |
| एकूण | — | ४८९ | — | १०५९४४४९५ | | |

संदर्भ : मॉरीस जॉन्स, डब्लू.एच. गव्हर्नमेंट ॲण्ड पॉलिटिक्स ऑफ इंडिया, पान क्र. १८४.

२. दुसरी सार्वत्रिक निवडणूक १९५७ :-

भारतामध्ये पंतप्रधान नेहरूंच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे सरकार अधिकारावर आल्यानंतर त्यांनी काँग्रेसचा पाया मजबूत करण्याचा प्रयत्न केला. १९१७ नंतर रशियाने नियोजनाचा अंगीकार करून आपल्या देशाची अल्पावधीतच प्रगती केली. हा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पं. नेहरूंनी नियोजनबध्द आर्थिक विकास, ध्येय-धोरणांची अंमलबजावणी, समाजसुधारणेचा कार्यक्रम आणि मालमत्तेचा अधिकार इत्यादी कार्यक्रमांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याचे ध्येय ठेवले. भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना करावी यासाठी विरोधी पक्षांनी वादळ उठविले. तेव्हा काँग्रेसने जनतेपासून दूर जाऊ नये या लोकदबावाखाली त्याची अंमलबजावणी केली. १९५४-५५ मध्ये रशियाबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे अवडी अधिवेशनात काँग्रेसने आपल्या समाजवादी धोरणात बदल केला. समाजवादी समाजरचना प्रस्थापित करून देशाचा आर्थिक विकास करण्याचे उद्दीष्ट काँग्रेसने स्वीकारले कारण प्रत्येकाचा आर्थिक विकास समान व्हावा आणि विषमता नष्ट व्हावी ही त्या पाठीमागची भूमिका होती." ७

काँग्रेस आपली सत्ता बळकट करीत असतानाच प्रमुख विरोधी पक्ष म्हणून ओळखल्या जाणा-या समाजवादी पक्षात फूट पडली. कारण काँग्रेसने समाजवादी धोरणाचा स्वीकार केला. त्याचवेळी जयप्रकाश नारायण आणि अच्युतराव पटवर्धन यांनी राजकारणाचा त्याग केला आणि आचार्य नरेंद्र देव यांचा मृत्यु झाला. आचार्य कृपालानींनी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देऊन प्रजा समाजवादी पक्षाची स्थापना केली. अशाप्रकारे समाजवादी पक्षाची प्रजा समाजवादी पक्ष आणि डॉ. लोहिया यांचा समाजवादी पक्ष या दोन पक्षात विभागणी झाली. पुन्हा दोन्ही पक्ष एकत्र आले. त्यांच्यातील नेतृत्वाचा संघर्ष कायम राहून पक्षाची प्रतिष्ठा लोप पावली.

१९५७ च्या निवडणूकीत आंध्र प्रदेशात भारतीय कम्युनिस्ट पक्षाला आव्हान देऊन काँग्रेस पक्षाने आपली पकड मजबूत केली. उजव्या पक्षाचं आव्हान काँग्रेसच्या दृष्टीने मजबूत नव्हतो. हिंदुत्ववादी पक्षांनी आपले अस्तित्व गमावले.

कम्युनिस्ट पक्षांनी समाजवादी लोकशाही कामगार अगर श्रमजीवी वर्गाच्या सत्तेखाली स्थापन करणे, समाजवादी समाजरचना स्थापन करणे, मनुष्याची मनुष्याकडून पिळवणूक थांबविणे इत्यादी उद्दीष्टांच्या आधारे आपली स्थिती सुधारली. या निवडणूकीत जनसंघाला आपली स्थिती सुधारता आली नाही. परंतु दक्षिणेकडील राज्याला त्यांची स्थिती मजबूत राहिली म्हणून जनसंघाबाबत असं म्हणतात की, मागील पांच वर्षात जनसंघाची गती मंद होती. परंतु सुधारणावादी चळवळीमुळे त्यांची ताकद हळूहळू वाढत गेली. ८

विधानसभेच्या निकालावरून असे दिसून आले की, केरळमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाने बहुमत मिळविले. काँग्रेसने या निवडणूकीत ४७ टक्के मते मिळविली. इतर कोणताही पक्ष काँग्रेसची तुलना करू शकला नाही.

पहिल्या दोन सार्वत्रिक निवडणूकांचा विचार केल्यास देशाच्या राजकीय परिस्थितीमध्ये या काळात विशेष फरक पडला नाही. काँग्रेस आणि विरोधी पक्ष यांचे बलाबल पूर्वीसारखेच राहिले. निवडणूकीत मतदान करणाऱ्यांची संख्या दर निवडणूकीत वाढत गेल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. २
दुसरी सार्वत्रिक निवडणूक १९५७

| पक्ष | उमेदवार | जिंकलेल्या जागा. | जागांची टक्केवारी | मिळालेली मते | मतांची टक्केवारी | प्रत्येक उमेदवाराची मते. |
|---|---|---|---|---|---|---|
| कॉंग्रेस | ४९० | ३७१ | ७५. १ | ५७५७९५९३ | ४७. ४८ | १, १७, ५०९ |
| भा. क. प. | १०८ | २७ | ५. ४ | १०७५४०७५ | ८. ९२ | ९९, ५७५ |
| प्र. स. प. | १८९ | १९ | ३. ८ | १२५४२६६६ | १०. ४१ | ६६, ३६३ |
| जनसंघ | १३० | ४ | ०. ८ | ७१४९८२४ | ५. ९३ | ५४, ९९९. |
| हिंदू महासभा | १९ | १ | ०. २ | १०३२३२२ | ०. ८६ | ५४, ३३३ |
| आर. पी. आय. | १९ | ४ | ०. ८ | १८१२९१९ | १. ५ | ९५, ४१७ |
| आर. आर. पी. | १५ | — | — | ४६०८३८ | ०. ३८ | ३०, ७२३ |
| इतर पक्ष | ७३ | २९ | ५. ९ | ५८०४८७३ | ४. ८१ | ७९, ५१९ |
| स्वतंत्र/अपक्ष | ४७५ | ३९ | ७. ९ | २३३७७८०५ | १९. ३९ | ४९, २१६ |
| एकूण | — | ४९४ | — | २०५१३९१५ | | |

संदर्भ : मॉरीस-जॉन, डब्लू. एच. गव्हर्नमेंट ॲण्ड पॉलिटिक्स ऑफ इंडिया, पान क्र. १८४.

३. तिसरी सार्वत्रिक निवडणूक १९६२ :-

गेल्या दोन सार्वत्रिक निवडणूकांचा विचार केला तर या निवडणूकीत भारतीय राजकारणातील कॉंग्रेसचे सामर्थ्य आधिक वाढले. प्रजासमाजवादी पक्ष आणि समाजवादी पक्ष कॉंग्रेसने स्वीकारलेल्या समाजवादी धोरणामुळे पुन्हा अपयशी ठरले. पं. नेहरू पुन्हा प्रसिध्दीच्या झोतात आले कारण नेहरूंनी गोवा, दीव, दमण यांची पोर्तुगीजांच्या साम्राज्यातून मुक्तता केली आणि त्यांच्या नियोजनबध्द विकासासाठी पाऊले उचलली. त्या ठिकाणी उद्योगधंदे आणि औद्योगिकीकरणाचे जाळे पसरविले, पंचवार्षिक योजना आखल्या अशाप्रकारचे धोरण अवलंबीले. चीन युध्दाचा परिणाम म्हणून कम्युनिस्टांनी आपली प्रतिमा कायम ठेवली त्यांनी साम्राज्यशाही आणि सरंजामशाही विरोधी लोकशाहीवादी क्रांती पूर्ण करणे या धोरणाचा पाठपुरावा करण्याचे ठरविले, भांडवलशाही मक्तेदारीला आळा घालणे, श्रमिकांना कीमान वेतन देणे इत्यादी उद्दीष्टये साध्य करण्याचे अभिवचन दिले.

या निवडणूकीत पं. नेहरूंच्या प्रभावी नेतृत्वामुळे आणि कार्यक्रमामुळे कॉंग्रेस पक्षाला लोकसभेत बहुमत मिळाले. कॉंग्रेसने ३६१ जागा जिंकल्या यावरून असा निष्कर्ष काढला जातो की, "कॉंग्रेस पक्षात नेहरूंचे एकमेव नेतृत्व आहे की जो मतदारांचा आत्मा आहे. नेहरूंचे नेतृत्व देशाचे स्वातंत्र्याचे रक्षण करणारं, देशाला स्थिरता मिळवून देणारं असं होतं. त्यांच्या नेतृत्वामुळेच देशाला शांतता मिळाली. पंचवार्षिक नियोजनाचा मार्ग आखला. देशाला प्रगती-पथावर पोहचविण्याचे काम सुध्दा नेहरूंच्या प्रभावी नेतृत्वामुळेच झाले." ७

स्वतंत्र पक्षाची स्थापना १९५९ मध्ये डॉ. राजगोपालाचारी यांनी केली. कॉंग्रेसने घेतलेल्या समाजवादाच्या व कल्याणकारी राज्यांच्या पावित्र्यामुळे सामान्य नागरिकांच्या जीवनाच्या सर्वच क्षेत्रावर राज्याची घट्ट पकड बसत चालली आहे. अनेक नव्या संस्था, यंत्रणा सत्ताधारी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

राजकीय पक्ष उभारीत आहे. आर्थिक, सामाजिक तसेच पंचायत राज्याच्या क्षेत्रातही उभारलेल्या संस्थांशी या सत्ताधारी पक्षातील नांवे निगडीत ठेवली जातात. सरकारच्या या सर्वांगीण कार्यामुळे व त्यात सत्तारूढ असलेल्या पक्षाच्या नेत्यांच्या सत्कार्यामुळे सामान्य माणसांच्या मनात "राज्य=काँग्रेस" असे समीकरण तयार होते. ही एकपक्षीय हुकूमशाहीच्या दिशेनेच होणारी वाटचाल आहे. परकीय सत्तेशी लढतांना वापरलेला ध्वज व उभारलेली संघटना आजही काँग्रेस पक्ष वापरतो, याही गोष्टीचा त्यास फायदा होतो. साम्यवादी देशात असते तशी एकपक्षीय हुकूमशाही या देशात होऊ न देणे ही स्वतंत्र पक्षाच्या निर्मितीमागील प्रेरणा आहे. व्यक्तीला राज्याच्या अतिरिक्त हस्तक्षेपापासून वाचवून लोकशाहीवरील हे गंडांतर टाळणे हे साध्य आहे. सर्वसाधारणपणे असे समजण्यात येते की, "काँग्रेसने आपल्या नागपूर अधिवेशनात सहकारी शेतीचा ठराव पास केला त्याची प्रतिक्रीया म्हणून स्वतंत्र पक्षाची स्थापना झाली. वास्तविक नागपूरचा ठराव हे स्वतंत्र पक्षाच्या निर्मितीचे कारण नव्हते. त्या ठरावाने फक्त पक्षाची जन्मतिथी मुक्रर केली.[१०] या पक्षातील हुशार, बुध्दीमान नेत्यांमुळे भारतीय संसदेतील चर्चा आणि वादविवादाचे स्वरूप उंचावले. या पक्षाने या निवडणूकीत १८ जागा जिंकल्या. जनसंघाने आपली स्थिती सुधारून १४ जागा जिंकल्या. जनसंघ आणि स्वतंत्र पक्ष यांच्या स्थितीचा विचार करता भारतीय राजकारणात उजव्या पक्षांचे सामर्थ्य वाढत असलेले दिसते. कम्युनिस्ट पक्ष पुन्हा दुसऱ्या क्रमांकाचा विरोधी पक्ष ठरला यावरून असे दिसते की, उजवे पक्ष हे डाव्या पक्षांना पाठीमागे टाकून किंवा त्यांच्यात फूट पाडून पुढे जातील असे खाली दिलेल्या तक्त्यावरून दिसून येईल.

तक्ता क्रमांक ३

तिसरी सार्वत्रिक निवडणूक १९६२.

| पक्ष | उमेदवार | जिंकलेल्या जागा | जागांची टक्केवारी | मिळालेली मते | मतांची टक्केवारी | प्रत्येक उमेदवाराची मते. |
|---|---|---|---|---|---|---|
| काँग्रेस | ४८८ | ३६१ | ७३.१ | ५१८०९०८० | ४४.७२ | १०५५५६ |
| स्वतंत्र पक्ष | १७३ | १८ | ३.६ | ९०८५२५२ | ७.८९ | ५१९८८ |
| भा. क. प. | १३७ | २९ | ५.९ | ११४५००३७ | ९.९४ | ८३५७७ |
| प्र. स. प. | १६८ | १२ | २.४ | ७८४८३४५ | ६.८१ | ४६७१६ |
| समाजवादी पक्ष | १०७ | ६ | १.२ | ३०९९३९३ | २.६९ | २८०३२ |
| जनसंघ | १९६ | १४ | २.८ | ७४१५१७० | ६.४४ | ३७८३२ |
| हिंदू महासभा | ३८ | १ | ०.२ | ७४७८६१ | ०.६५ | १९६८१ |
| आरपीआय | ६८ | ३ | ०.६ | ३२५५९८५ | २.८५ | ४७८८२ |
| आरआरपी | ४१ | २ | ०.४ | ६८८९९० | ०.६० | १६८०५ |
| इतर पक्ष | ८९ | २८ | ५.७ | ७३१८९५६ | ६.३५ | ८२२३५ |
| अपक्ष/स्वतंत्र | ४८० | २० | ४.० | १२७४९८१३ | ११.०८ | २६५६२ |
| एकूण | | ४९४ | | ११५१६८८९० | | |

संदर्भ : मॉरीस जॉन, डब्लू.एच. गव्हर्नमेंट अँण्ड पॉलिटिक्स ऑफ इंडिया, पान क्र. १८५.

## ४. चौथी सार्वत्रिक निवडणूक १९६७ :-

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस पक्ष विरोधी पक्षांच्या आव्हानांना तोंड देण्यास यशस्वी ठरला, परंतू यावेळी काँग्रेसला भारत-चीन आणि भारत-पाक या युध्दांना तोंड द्यावे लागले. याच कालावधीत काँग्रेसने पं. नेहरू आणि लाल बहादूर शास्त्री या दोन पंतप्रधानांना गमावले. हीच काँग्रेसच्या दृष्टीने १९६७ साली मोठी हानी ठरली. काँग्रेसने या निवडणूकीत स्वीकारलेल्या धोरणांमध्ये प्रामुख्याने देशात आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापित करणे, देशात औद्योगिकरण घडवून आणणे, सार्वजनिक क्षेत्राची वाढ करणे, गरिबीचे उच्चाटन, धर्म निरपेक्षतेचा पुरस्कार इत्यादी धोरणे होती.

१९६२ मधील भारत-चीन व १९६५ मधील भारत-पाक या दोन युध्दामुळे भारताच्या विकासाचा कार्यक्रम कोसळला. त्याच काळात काँग्रेसचे दोन नेते पं. नेहरू आणि लालबहादूर शास्त्री हे दोघेही निघतले. या काळात काँग्रेस पक्ष हा सिंडीकेटच्या वर्चस्वाखाली होता. शक्तीहीन नेत्या इंदिरा गांधी यांनी आपली शक्ती वाढविण्याचा प्रयत्न केला. चीन व पाकिस्तान या दोन देशांशी झालेल्या युध्दांमुळे देशाची अर्थव्यवस्था कमकुवत झाली. भाववाढ, चलनवाढ आणि टंचाई या समस्यांनी देशात थैमान घातले होते. चीनने केलेल्या पराभवामुळे देशाची आंतरराष्ट्रीय प्रतिमा कमी झाली या वातावरणात १९६७ च्या निवडणूका घेण्यात आल्या आणि त्यामध्ये काँग्रेस पक्षाचे सरकार स्थापन झाले.

१९६६ मध्ये देशाला कोरडया दुष्काळाला तोंड द्यावे लागले, या काळात देशाला पूर्णपणे अमेरिकेवर अवलंबून रहावे लागले, त्यामुळे भारत अमेरिकेच्या दडपणाखाली होता. सरकारचं महत्व कमी झाल म्हणूनच १९६७ ची निवडणूक काँग्रेसच्या दृष्टीने महत्वाची ठरली.

..११..

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

१९६४ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे विघटन झाले कारण १९६२ च्या चीन युध्दामुळे त्या पक्षात दोन गट पडले. भारतीय कम्युनिस्ट आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढविली. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या चीनवादी धोरणामुळे काँग्रेसने या पक्षाचा छळ करण्यास सुरुवात केली तरीसुध्दा मध्यावधी निवडणूकीत केरळमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने मोठया प्रमाणात जागा जिंकल्या. विशेषत: केरळ आणि प. बंगालमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची पकड घट्ट झाली.

१९६४ मध्ये समाजवादी पक्ष आणि प्रजासमाजवादी पक्ष एकत्र येऊन त्यांनी संयुक्त समाजवादी पक्षाची स्थापना केली. त्यांच्यातील फूट पडून प्रजासमाजवादी आणि संयुक्त समाजवादी असे दोन पक्ष बनले. या विभाजनानंतर प्रजासमाजवादी पक्षापेक्षा संयुक्त समाजवादी पक्ष बळकट बनला. १९६७ च्या निवडणूकीच्या वेळी समाजवादी पक्षाचे नेते डॉ. राममनोहर लोहिया यांनी असे सूचित केले की, संयुक्त समाजवादी पक्षाने नवकाँग्रेसच्या युंक्तीवादाचा स्वीकार करावा.

प्रजासमाजवादी पक्षाने मोठया उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण, बँक, परदेशी कंपन्या यांचे राष्ट्रीयीकरण, आर्थिक विकासासाठी करण्यात येणा-या योजनांत मोठे उद्योगधंदे, खनिज तेले, रासायनिक द्रव्ये यांना महत्वाचे स्थान देणे, जमीन सुधारणा घडवून आणणे, मिश्रअर्थव्यवस्था, मक्तेदारीला आळा, किंमती स्थिर ठेवणे, शिक्षणात प्रगती घडवून आणणे इत्यादी, तर संयुक्त समाजवादी पक्षाने आपल्या जाहिरनाम्यात लोकशाही आणि शांततेच्या मार्गांनी समाजवाद प्रस्थापित करणे, आर्थिक आणि सामाजिक पिळवणूकीला पायबंद घालणे, उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करणे, आर्थिक विषमता नष्ट करणे, नागरी स्वातंत्र्याचे रक्षण करणे, राजकीय नेत्यांच्या गैरव्यवहारांची चौकशी करणे अशा प्रकारची आश्वासने दिली.

काँग्रेसच्या अपयशाचं भांडवल करून उजव्या पक्षांनी, विशेषत: स्वतंत्र-पक्ष आणि जनसंघ यांनी उल्लेखनीय प्रगती केली. चीनच्या आक्रमणानंतर जनसंघाने आक्रमक पावित्रा घेतला. त्याने राजकारणात आपली पकड घट्ट केली. भारतीय जनसंघाने उजव्या विचारसरणीचा पुरस्कार केला असून भारतीय संस्कृतीवर आधारलेली राजकीय, आर्थिक आणि सामाजिक लोकशाही प्रस्थापित करणे, मातृभूमिबद्दल निष्ठा आणि राष्ट्रप्रेम यांना महत्वाचे स्थान देणे, स्वतंत्र पक्षाने सरकारी हस्तक्षेप आणि नियंत्रण याला विरोध, खाजगी उद्योगधंद्यांना संधी, आर्थिक नियोजनात शेतीला प्राधान्य, किंमती स्थिर ठेवणे आणि संघटनेचे पावित्र्य टिकविणे ही उद्दीष्टे ठेवली होती. निवडणूक निकालावरून असे दिसते की, स्वतंत्र पक्ष आणि जनसंघ यांनी लोकसभेत ८० जागा जिंकल्या. ही उजव्या पक्षाच्या पुनरूज्जीवनाची नांदी आहे असंच म्हणावं लागेल.

राजकीय परिस्थितीचा विचार केला तर विरोधी पक्षांनी प्रादेशिक पक्षांशी आघाडया करून विविध आठ राज्यात काँग्रेसला शह दिला. या आठ राज्यात बिगर काँग्रेस सरकारे अधिकारारूढ झाली. काँग्रेस पक्षाची एकाधिकारशाही किंवा सत्तेतील मक्तेदारीचा अंत झाला. प्रा. इकबाल नरेन या स्थितीचं वर्णन केले आहे ते असं की, "चौथ्या सार्वत्रिक निवडणूकीने काँग्रेसला त्यांची भारतीय राजकारणातील जागा दाखवून दिली आहे." [११] चौथी सार्वत्रिक निवडणूक ही काँग्रेसच्या पंचवीस वर्षाच्या कारकिर्दीला तडा घालविणारी ठरली. निम्म्या घटकराज्यामध्ये काँग्रेसला सत्ता गमवावी लागली. केंद्र स्थानी काँग्रेसने काठावरचे बहूमत प्राप्त केले. प्रादेशीक पक्ष आणि विरोधी पक्ष यांचा पाया भक्कम बनला.

१९६७ च्या निवडणूकांमध्ये देशातील महत्वाच्या प्रत्येक पक्षाला कोणत्या ना कोणत्या राज्यात कमी आधिक यश प्राप्त झाले होतेच.

स्वतः च्या पायावर आपले स्वतंत्र सरकार प्रस्थापित करण्याइतपत बळ कोणत्याच विरोधी पक्षाला मिळू शकले नाही. त्यामुळे अनेक पक्षांची संयुक्त सरकारे निर्माण करण्याखेरीज विरोधी पक्षांना गत्यंतर नव्हते. या गरजेतून अनेक प्रकारच्या युती निर्माण झाल्या. विविध आठ राज्यात विरोधी पक्षांची सरकारे अधिकारावर आली. परंतु ही सरकारे फार काळ टिकू शकली नाहीत. कारण संसदीय लोकशाहीत राजकीय पक्ष आणि त्यांचे सरकार यांच्यात अत्यंत घनिष्ठ व सातत्यपूर्ण संबंध असणे आवश्यक असते, मुख्यमंत्र्यांना योग्य निर्णय घेणे कठीण झाले. पक्षांतराची टांगती तलवार संयुक्त सरकारवर कायम टांगती होती. संयुक्त सरकारमध्ये प्रत्येक सहपक्षाच्या मंत्रीपक्षाच्या मागण्या पूर्ण करणे अशक्य होते. या कारणामुळे १९६७ मध्ये स्थापन झालेल्या संयुक्त सरकारच्या प्रयोगाला अपयश आले.

## तक्ता क्र. ४

### चौथी सार्वत्रिक निवडणूक १९६७.

| पक्ष | उमेदवार | जिंकलेल्या जागा | जागांची टक्केवारी | मिळालेली मते | मतांची टक्केवारी | प्रत्येक उमेदवाराची मते. |
|---|---|---|---|---|---|---|
| कॉंग्रेस | ५१६ | २८४ | ५४. ९ | ५९४०२७५४ | ४०. ७ | ११५१३५ |
| स्वतंत्र पक्ष | १७९ | ४४ | ८. ५ | १२६५९५४० | ८. ७ | ७०८२५ |
| भा. क. प. | ११० | २३ | ४. ४ | ७५६४१८० | ५. २ | ६८७६५ |
| मा. क. प. | ५८ | २९ | ३. ७ | ६१४०७३८ | ४. २ | १०५४१५ |
| क. प. | १६८ | ४२ | ८. १ | १३७०४९१८ | ९. ४ | ८७०८६ |
| प्र. स. प. | १०९ | १३ | २. ५ | ४१५६४८७ | ३. १ | ४०८८५ |
| सं. स. प. | १२२ | २३ | ४. ४ | ७१७१६२७ | ४. ९ | ५८७८४ |
| जनसंघ | २५१ | ३५ | ६. ७ | १३७१५९३१ | ९. ४ | ५४६४५ |
| हिंदू महासभा | — | — | — | — | — | — |
| आर. पी. आय. | ७० | १ | ०. २ | ३६०७७११ | २. ५ | ५१५३९ |
| आर. आर. पी. | — | — | — | — | — | — |
| इतर पक्ष | ८९ | ४३ | ८. ३ | ११०९६३४२ | ७. २ | १२४६७८ |
| स्वतंत्र | ८६५ | ३५ | ६. ७ | २००५१२०० | १३. ८ | २३१८१ |
| एकूण | | ५२० | | १४५८६६५१० | | |

संदर्भ : मॉरीस जॉन, डब्लू. एच. गव्हर्नमेंट ॲण्ड पॉलिटिक्स ऑफ इंडिया, पान क्र. १८५.

## ५. लोकसभेची मध्यावधी निवडणूक १९७१ :-

काँग्रेसने १९६९ मधील विभाजन ही भारतीय राजकारणातील महत्त्वपूर्ण घटना आहे. राष्ट्रपतीच्या निवडणूकीवरून काँग्रेस पक्षात मतभेद विकोपाला गेले त्यातूनच पुढे काँग्रेस पक्षात फूट पडली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली नवकाँग्रेस तर श्री. निजलिंगाप्पा यांच्या नेतृत्वाखाली मोरारजी देसाई, स.का.पाटील, श्री. कामराज यांच्या सहकार्याने संघटना काँग्रेस पक्ष स्थापन झाला. परंतू खरी काँग्रेस कोणती या वादास तोंड फूटले. इंदिरा गांधींनी समाजवादाचा जोरदार पुरस्कार केला. बँक राष्ट्रीयीकरण, गरीबी हटाव, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे इत्यादी निर्णयामुळे समाजातील कनिष्ठ वर्गामध्ये काँग्रेसला अनूकूल मत निर्माण झाले होते. विरोधी पक्षांनी मात्र काँग्रेस विरोधाचेच भांडवल केले व त्यावर आपली भिस्त ठेवली. १९६७ नंतर स्थापन झालेल्या संयुक्त सरकारचे अपयश मतदारासमोर होतेच म्हणूनच याचा सर्व फायदा काँग्रेसला झाला. [१२]

या मध्यावधी लोकसभा निवडणूकीत संघटना काँग्रेसच्या नेत्यांनी अशी भूमिका घेतली होती की, एक विरोधी पक्ष या नात्याने भारतीयांचे हित व उन्नती आर्थिक व सामाजिक समता ज्यात असेल, ज्या राज्याचे उद्दीष्ट विश्वशांती व विश्वबंधुत्व असेल अशा समाजवादी राज्याची उभारणी करणे. परंतू या पक्षाने निवडणूकीच्यावेळी जनसंघ व स्वतंत्र पक्ष यांच्याशी संयुक्त आघाडी केल्यामुळे हा पक्ष उजवीकडे झुकला आहे अशी टिका होऊ लागली. याचा परिणाम या पक्षाचे महत्त्व कमी होऊ लागले. [१३]

या निवडणूकीत कम्युनिस्ट पक्षांनी आपली ताकद कायम राखली. समाजवादी पक्षाची मात्र पिछेहाट झाली. कारण काँग्रेस पक्षाने समाजवादाचा जोरदार पुरस्कार केला होता. स्वतंत्र पक्षाला या निवडणूकीत जोरदार

..१५..

हादरा बसला. याचे महत्वाचे कारण म्हणजे संघटना कॉंग्रेसने या निवडणूकी-च्यावेळी उजव्या विचारसरणीचा पुरस्कार केला याचा सर्व उजव्या पक्षांना तडाखा बसला.

१९६७ च्या निवडणूक निकालाशी तुलना करता असे दिसून येते की, कॉंग्रेसच्या जागा वाढल्या आहेत आणि उजव्या पक्षांच्या जागा कमी झाल्याचे दिसते. परंतु त्यामध्ये स्वतंत्र पक्षाला जास्त झळ सोसावी लागली. विशेषत: म्हैसूर, बिहार, गुजराथ आणि तामिळनाडू मध्ये संघटना कॉंग्रेसने स्वतंत्र पक्षाची जागा घेतली.

१९७१ च्या लोकसभा निवडणूकीत इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस पक्षाला अभूतपूर्व यश मिळाले. लोकसभेच्या ५१२ जागांपैकी कॉंग्रेसला ३५० जागा मिळाल्या. एकूण मतापैकी ४३ टक्के मते या पक्षाला मिळाली. संघटना कॉंग्रेस जनसंघ व संयुक्त समाजवादी पक्ष या चार पक्षाच्या आघाडीने इंदिरा गांधींच्या "गरिबी हटाव" या घोषणेविरुध्द "इंदिरा हटाव" या नकारात्मक भूमिकेवरुन निवडणूक लढविली. या चार पक्षापैकी संघटना कॉंग्रेसला १६ जागा व ११ टक्के मते, जनसंघाला २२ जागा व ७.५ टक्के मते, समाजवादी पक्षाला ३ जागा, स्वतंत्र पक्षाला ८ जागा व ३ टक्के मते मिळाली. इतर पक्षापैकी भारतीय कम्युनिस्ट पक्षाला २३ जागा व मार्क्स-वादी कम्युनिस्ट पक्षाला २५ जागा, द्रमुकला २३ जागा, प्रजासमाजवादी पक्षाला २ जागा व अन्य पक्षांना ३०, तर अपक्षांना १३ अशी विभागणी झाली. १९७१ च्या निवडणूकीचा परिणाम म्हणजे देशात पुन्हा एकाच पक्षाच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण झाले आणि भारतीय मतदार पक्षांचा कार्यक्रम विचारात घेऊन मतदान करु लागले. [१४]

तक्ता क्रमांक ५

लोकसभेची मध्यावधी निवडणूक १९७१

| पक्ष | उमेदवार | जिंकलेल्या जागा. | मिळालेली मते. | मतांची टक्केवारी. |
|---|---|---|---|---|
| काँग्रेस [नवी] | ४४२ | ३५० | ६३, ०५०, ४७४ | ४०. ७३ |
| काँग्रेस [जुनी] | २३९ | १६ | १५, २५२, ३४० | १०. ५६ |
| स्वतंत्र पक्ष | ५८ | ८ | ४, ४४५, १४३ | ३. ०८ |
| जनसंघ | १५४ | २२ | १०, ८०८, ४५४ | ७. ४८ |
| मा. क. प. | ८६ | २३ | ७, ०५९, ३२७ | ४. ८९ |
| सं. स. प. | ९३ | ३ | ३, ५१६, ७३१ | २. ४३ |
| मा. क. प. | ८६ | २५ | ७, १८४, ५६० | ४. ९७ |
| प्र. स. प. | ६३ | २ | १, ४१०, ५०८ | ०. ९८ |
| इतर पक्ष | ४४५ | ५३ | १९, ७०२, ७२८ | १३. ५४ |
| अपक्ष | १, ११८ | १३ | १२, ०३०, ८८८ | ८. ३३ |
| एकूण | २, ७८४ | ५१५ | १४४, ४६१, १५३ | |

संदर्भ : गुप्ता आर. एल्. इलेक्ट्रोल पॉलिटिक्स इन इंडिया, पान क्रं. १४६, १४७.

६. १९७७ ची लोकसभा निवडणूक :-

१९७७ ची लोकसभा निवडणूक ही वेगळया वातावरणात झाली. १९७१ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणूकीत इंदिरा गांधींच्या नवकाँग्रेसला प्रचंड यश मिळाले. याचे कारण बांग्लादेशाशी झालेल्या युध्दात या पक्षाने यशस्वी कामगिरी बजावली होती. शिवाय आपल्या इच्छा आकांक्षा इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्ष सफल करू शकेल या विश्वासापोटी देशातील सर्वसामान्य जनतेने नव काँग्रेसला भक्कम पाठींबा दिला. १९७१ ते १९७७ या काळात इंदिरा गांधींनी सत्तेचा दुरूपयोग केला. त्यांनी एकाधिकारशाही निर्माण करून विरोधी राजकीय पक्षांचे खच्चीकरण करण्याचे प्रयत्न सुरू केले. भ्रष्टाचारी जुलुमी वृत्तीने राज्य कारभार सुरू ठेवला त्यामुळे काँग्रेस पक्षाविषयी जनतेत असंतोष धुमसला. देशातील विरोधी पक्ष आणि विविध संघटना यांनां एकत्र येऊन काँग्रेसच्या जुलुमी राजवटीला विरोध करण्याची जाणीव होऊ लागली. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या एकाधिकारशाही विरूध्द व भ्रष्टाचाराविरूध्द देशभर लढा सुरू झाला. या काळात देशातील बेकारी वाढली, जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढल्या. यामुळे सरकारची विश्वासार्हता ढासळली. दरम्यान १२ जून, १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींची १९७१ मधील लोकसभेवरील निवड अवैध ठरविली. विरोधी पक्षांनी इंदिरा गांधींच्या राजीनाम्याची मागणी केली. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून २५ जून, १९७५ रोजी श्रीमती गांधींनी आणिबाणी घोषित केली. आणीबाणीच्या काळात मूलभूत हक्कांचा संकोच झाला. विरोधी पक्षांच्या अनेक नेत्यांना तुरूंगात टाकण्यात आले. इंदिरा गांधींनी वृत्तपत्र स्वातंत्र्य हिरावून घेतले. ४२ व्या घटना दुरूस्तींनी न्यायालयाचे अधिकार संपुष्टात आणले. अशाप्रकारे एकाधिकारशाही प्रस्थापित करून इंदिरा गांधींनी संपूर्ण देशभर वचक बसविला. [१५] या परिस्थितीत भारतीय जनता आपल्याच बाजूने कौल देईल अशा खोटया समजुतीने

त्यांना घेरले आणि १८ जानेवारी, १९७७ रोजी लोकसभेची निवडणूक घेण्याचा निर्णय घेतला.

अनेक पक्ष निवडणूकीत सहभागी झाले म्हणजे मतांची विभागणी होते व त्याचा फायदा कॉंग्रेस पक्षाला मिळतो, म्हणून जयप्रकाश नारायण यांनी म्हटले आहे की, "कोणताही एक पक्ष वा पक्षाचा कुंभमेळा हे कार्य पार पाडू शकणार नाही. सर्वांचा मिळून एक विरोधी पक्ष निर्माण केला पाहिजे जेणे-करून मतांची विभागणी टळेल." [१६] निवडणूकीच्या तोंडावर जगजीवनराम, हेमवतीनंदन बहुगुणा, नंदिनी सत्पथी, के. आर. गणेश इत्यादी नेत्यांनी कॉंग्रेसमधून बाहेर पडून लोकशाही कॉंग्रेसची स्थापना केली. २३ जानेवारी, १९७७ रोजी संघटना कॉंग्रेस, जनसंघ, समाजवादी पक्ष, भारतीय क्रांतीदल या पक्षांचा मिळून जनता पक्ष स्थापन झाला. जनता पक्षाने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, शे. का. पक्ष, फॉरवर्ड ब्लॉक आणि इतर कांही पक्षांच्या सहकार्याने कॉंग्रेस विरोधी आघाडी तयार केली, त्यामुळे या निवडणूकीत कॉंग्रेसचा प्रचंड पराभव झाला. खुद्द इंदिरा गांधी पराभूत झाल्या. लोकसभेच्या ५४२ जागांपैकी फक्त १५३ जागा व ३४.५४ टक्के मते कॉंग्रेसला मिळाली. उत्तरेकडील सर्व राज्यात कॉंग्रेसचे पानिपत झाले. दक्षिणेकडील राज्यात मात्र कॉंग्रेसला चांगले यश मिळाले. जनता पक्षाला २७० आणि लोकशाही कॉंग्रेसला २८ जागा मिळाल्या. या दोन्ही पक्षांच्या मतांची टक्केवारी ४३.१७ इतकी होती. मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाला २२ जागा तर भारतीय कम्युनिस्ट पक्षाला ७, आण्णा द्रमुकला १९, द्रमुकला १, अन्य पक्षाला ३२९ अपक्षांना ८ जागा मिळाल्या. निवडणूकीनंतर केंद्रात जनता पक्षाचे सरकार अधिकारा-रूढ झाले. पुढे लोकशाही कॉंग्रेस जनता पक्षात विलीन झाला.

तक्ता क्रमांक ६

१९७७ ची सार्वत्रिक निवडणूक.

| | एकूण जागा | काँग्रेस (आय) | जनता पक्ष | भाकप | माकप | इतर | स्वतंत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | ४२ | ४१ | १ | - | - | - | - |
| आसाम | १४ | १० | ३ | - | - | - | - |
| बिहार | ५४ | - | ५४ | - | - | - | - |
| गुजराथ | २६ | १० | १६ | - | - | - | - |
| हरियाना | १० | - | १० | - | - | - | - |
| हिमाचल प्रदेश | ४ | - | ३ | - | - | - | - |
| जम्मू आणि काश्मिर | ६ | २ | - | - | - | २ | १ |
| कर्नाटक | २८ | २६ | २ | - | - | - | - |
| केरळ | २२ | ११ | - | ४ | - | ५ | - |
| मध्यप्रदेश | ४० | १ | ३७ | - | - | १ | १ |
| महाराष्ट्र | ४८ | २० | १९ | - | ३ | ६ | - |
| मणिपूर | २ | २ | - | - | - | - | - |
| मेघालय | २ | १ | - | - | - | १ | - |
| नागालँड | १ | - | - | - | - | १ | - |
| ओरिसा | २१ | ४ | १५ | - | १ | - | १ |
| पंजाब | १३ | - | ३ | - | १ | ९ | - |
| राज्यस्थान | २५ | १ | २४ | - | - | - | - |
| सिक्कीम | १ | १ | - | - | - | - | - |
| तामिळनाडू | ३९ | १४ | ३ | ३ | - | १९ | - |
| त्रिपूरा | २ | १ | १ | - | - | - | - |
| उत्तारप्रदेश | ८५ | - | ८५ | - | - | - | - |
| पश्चिम बंगाल | ४२ | ३ | १५ | - | १७ | ६ | १ |
| अंदमान | १ | १ | - | - | - | - | - |
| अरुणाचल प्रदेश | २ | १ | - | - | - | - | १ |
| चंदिगड | १ | - | १ | - | - | - | - |
| दादरानगर हवेली | १ | १ | - | - | - | - | - |
| दिल्ली | ७ | - | ७ | - | - | - | - |
| गोवा | २ | १ | - | - | - | १ | - |
| लक्षद्विप | १ | १ | - | - | - | - | - |
| मिझोराम | १ | - | - | - | - | - | १ |
| पाँडिचरी | १ | - | - | - | - | १ | - |
| एकूण | ५४२ | १५३ | २९९ | ७ | २२ | ५२ | ७ |

जम्मू आणि काश्मिर व हिमाचल प्रदेश या प्रदेशातील प्रत्येकी १ याप्रमाणे दोन जागांच्या निवडणूका झाल्या नाहीत.

संदर्भ - पॉल शारदा, जनरल इलेक्शन इन इंडिया, असोसिएटेड पब्लिसिंग हाउस, न्यू दिल्ली, १९८०. पान ३३५.

## १९५२ ते १९७७ पर्यंतच्या सार्वत्रिक निवडणूकीतील मतदार वर्तन :-

भारतातील सार्वत्रिक निवडणूकांचा अभ्यास करतांना निवडणूकीवर मतदार वर्तनाचा परिणाम कितपत झाला आहे, हे पाहणे संयुक्तिक ठरेल. भारतातील निवडणूकांचा मतदार वर्तनाच्या संदर्भात विचार केला तर १९५२ पासून १९६२ पर्यंत पहिल्या तीन सार्वत्रिक निवडणूकीमध्ये मतदारांनी आपल्या मताद्वारे कोणताही बदल घडवून आणलेला नाही. लोकोंनी काँग्रेसलाच सत्तेस्थानी निवडून दिले. याचे कारण म्हणजे भारतातील या पक्षाच्या पाठीमागे स्वातंत्र्यप्राप्तीचा वारसा होता. परंतु १९६७ च्या निवडणूकीमध्ये मात्र काँग्रेसला मोठया प्रमाणांत अपयश आले. केंद्रस्थानी काँग्रेसची सत्ता प्रस्थापित झाली तरी विविध आठ राज्यात काँग्रेसविरोधी सरकारे अधिकारावर आली. म्हणूनच या निवडणूकीच्यावेळी काँग्रेसचा एकछत्री अंमल कमी झाला. याचे महत्वाचे कारण म्हणजे १९६२ ते १९६७ च्या कालावधीत या पक्षाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेले. त्यामध्ये प्रामुख्याने भारताला चीन व पाकिस्तान या दोन शेजारील देशांशी युध्द करावे लागले. याच काळात पं. नेहरु आणि लालबहादूर शास्त्री या दोन पंतप्रधानांचा अंत झाला आणि काँग्रेस पक्षात नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली. भाववाढ, चलनवाढ आणि टंचाई या सर्व कारणांचा मतदार वर्तनावर या निवडणूकीत परिणाम झाला आणि काँग्रेस पक्षाचे संख्याबळ थोडे कमी झाले. मात्र लोकसभेत काँग्रेस पक्ष विजयी झाला.

१९७१ च्या निवडणूकीत काँग्रेस पक्षाने पुन्हा आपले वर्चस्व सिध्द केले. या निवडणूकीत काँग्रेसने स्वीकारलेल्या जनकल्याणवादी धोरणांचा प्रभाव मतदार वर्तनावर पडलेला दिसून येतो. त्याशिवाय या काळात काँग्रेस पक्षाने विशेषत: इंदिरा गांधींनी "गरीबी हटाओ" या घोषणेद्वारे मतदारांना आकर्षून घेतले, आणि १९६७ नंतर स्थापन झालेल्या संयुक्त सरकारचे

..१९..

अपयश हे मतदारासमोर होतेच या सर्व घटनांबरोबर त्या काळात हरित क्रांती नंतर जे नव शेतकरी वर्ग निर्माण झाले. त्यामधील तळातील शेतकरी वर्ग आणि मागासवर्गीयांना आकर्षित अशी धोरणे १९७१ च्या निवडणूकीमध्ये तळागाळातल्या मतदारांच्या वर्तणूकीवर परिणामकारक ठरली.

१९७७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत मात्र मतदार वर्तनामध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून कॉंग्रेस पक्षाचा पराभव झाला. याचे मुख्य कारण १९७१ ते १९७७ या काळात इंदिरा गांधींनी सत्तेचा दुरुपयोग केला. बेकारी, जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढल्या यामुळे सरकारची विश्वासार्हता ढासळली. दरम्यान अलाहाबाद कोर्टाने इंदिरा गांधींची निवडणूक रद्द ठरविली, त्यामुळे त्यांनी आणीबाणी घोषित केली, अनेक विरोधी नेत्यांना तुरुंगात डांबले, वृत्तपत्र स्वातंत्र्यावर बंधने घातली, न्यायालयाचे अधिकार संपुष्टात आणले. अशाप्रकारे इंदिरा गांधींनी देशात एकाधिकारशाही प्रस्थापित केली. त्यामुळे या निवडणूकीत मतदार वर्तनात बदल झालेला दिसतो की, ज्यामुळे कॉंग्रेस पक्षाचा पराभव झाला.

अशाप्रकारे १९५२ ते १९६७ पर्यंतच्या पहिल्या तीन निवडणूकीत मतदार वर्तनात कोणत्याही प्रकारचा बदल झालेला दिसून आलेला नाही. मात्र १९६७ नंतर १९७७ पर्यंतच्या तीन निवडणूकांत मोठ्या प्रमाणांत बदल झालेला दिसतो. म्हणजेच १९६७ नंतर मतदारांनी जाणीवपूर्वक व राजकीय परिस्थितीचा अभ्यास करून मतदान केलेले दिसते. या निवडणूकीत मतदारांनी राजकीय पक्षांचे ध्येयधोरण, कार्यक्रम आणि प्रस्थापित राजकीय परिस्थिती यांचा विचार करून मतदान केलेले दिसते.

संदर्भ
---


१ जोशी प.ल. भारतीय संविधान शासन व राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर, १९८८, पान. ३७४.

२ छाब्रा हरिंदर के., स्टेट पॉलिटिक्स इन इंडिया सुरजित पब्लिकेशन, दिल्ली, १९७७, पान ४०२.

३ हार्डग्रेव्ह रॉबर्ट एल., गव्हर्नमेन्ट अँड पॉलिटिक्स इन ए डेव्हलपिंग नेशन, हारकोर्ट ब्रेस जोव्हानोविच १९७५, पान १९६, १९७,

४ सागर एन्.डी., इलेक्शन अँड पॉलिटिकल डेव्हलपमेंट, विकास पब्लिशिंग हाउस, दिल्ली १९७६, पान १२९

५ माहेश्वरी एस्.आर., जनरल इलेक्शन इन इंडिया, चैतन्य पब्लिशिंग हाउस, अलाहाबाद १९६२, पान ६८

६ पट्टाभिराम एम्., जनरल इलेक्शन इन इंडिया, १९६९, अलाइड पब्लिकेशन, बॉम्बे, १९६७

७ जोशी प.ल., भारतीय संविधान शासन व राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर, १९८८, पान १३०.

८ पोपलाई एस्.एल. (इडिटेड), नॅशनल पॉलिटिक्स अँड १९५७ इलेक्शन इन इंडिया, इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर १९५७, पान ३८

९ माहेश्वरी एस्.आर. ऑपसिट, पान १२७

१० प्रा. देशपांडे ना. र., प्रा. भोळे भा.ल. भारताचे शासन आणि राजकारण, कॉंटिनेन्टल प्रकाशन, पुणे १९७८, पान ५४६.

११ नरियन इक्बाल, डॉन ऑर टिप्लाइट, पॉलिटिकल चेंज इन इंडिया, १९७१, मिपलाल अग्रवाल ॲण्ड कं., १९७२, पान ७१

१२ प्रा. देशपांडे ना. र., प्रा. भोळे भा.ल., भारताचे शासन आणि राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८, पान ४५३.

१३ इबिड पान ५४०

१४ साधना, शनिवार ता. २७ सप्टेंबर १९८०, पान क्र. ५